**प्रेस नोट** **दिनांक ०७/०३/२०२२**

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | १३/२०२२ |
| ३ | कलम | कलम ७, ७अ भ.प्र.अधि. १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | लोकसेवक श्री भरत लक्ष्मणराव मुंढे, वय ३३ वर्षे, वर्ग–३, पोलीस उप निरीक्षक, (ना.म.जोशी मार्ग पोलीस ठाणे), मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३७,००,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ७,००,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रु. ७,००,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी यांचे नातेवाईकवर ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथे बलात्काराचा गुन्हा दाखल असून सदर गुन्हयामध्ये फिर्यादी यांना सह आरोपी न करण्यासाठी व बलात्काराच्या गुन्हयातील तक्रारदार हिची समजूत घालून तिने फिर्यादी यांचे विरूध तक्रार करू नये यासाठी म्हणून आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे स्वत:साठी रूपये ५ लाख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यासाठी रू.२ लाख व बलात्काराच्या गुन्हयातील फिर्यादी हिचेसाठी रूपये ३० लाख अशी एकूण ३७ लाख लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे त्यांनी दि. ०४/०३/२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार अर्ज दिला.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०४/०३/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे तडजोडी अंती रू. ३७,००,०००/– इतक्या रकमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केले.<br><br>आज दि. ०७/०३/२०२२ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी मागणी केलेल्या रकमेपैकी रू.७,००,०००/– इतकी लाचेची रक्कम फिर्यादी यांच्याकडून स्विकारली असता आलोसे यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून त्यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, ७अ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

( उज्वल अरूण वैद्य )
सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

**संपर्क**:–लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट — acbmaharashtra.gov.in, ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,फेसबुक: www.facebook.com Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net

Scanned with CamScanner